# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रार
## क्र. रामाआ/तक्रार/२५९/२०२५/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.रघुनाथ पर्वत कुवर,<br>रा.स.नं.६७/१, सप्तश्रृंगी रेसीडेन्सी, चर्चमागे, लखन डेअरीसमोर, मालेगाव, ता.मालेगाव, जि.नाशिक-४२३१०५ | तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग, ता.मालेगाव, जि.नाशिक. |

### सुनावणी दिनांक-१६/०७/२०२५

तक्रारदार यांनी दि.१७/०६/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, " द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक संदर्भिय विषयान्वये चा निकाल मला जावक क्र.२८३२ दि.१५/०४/२०२५ रोजी प्राप्त झाला. सुनावणी दिनांक १०/०७/२०२४ रोजी झाली, १) त्यात विद्यमान जन माहिती अधिकारी, श्री.अमित साने, २) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.अमित साने, ३) विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्रीमती. मिनाक्षी कदम, ४) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी, श्री.राजेंद्र आण्णासाहेब पालवे, हे सुनावणी दरम्यान आयोगासमोर गैरहजर होते.

संदर्भिय आदेशात नमूद केल्याप्रमाणे मला आजपावेतो माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्याने न्यायालयाचा अवमान झालेला आहे.

तरी उक्त कायद्याच्या कलमानुसार वरील १ ते ४ यांच्यावर दंडात्मक कार्यवाही होणेस विनंती व केलेल्या कार्यवाहीबाबत मला तात्काळ अवगत करावे अशी आयोगास पुन:श्च विनंती आहे." असे नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे.

२. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि.१६/०७/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी – तक्रारदार, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दि.१८/१०/२०२१ रोजीच्या मूळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

"१)मौजे अजंग येथील गा.न.नं.१५ ची साक्षांकित प्रत (दि.३०/०४/२००९ ते ३१/०३/२०१० पावेतो). २)दि.१३/०९/२०२१ रोजी सौ.ललीता रघुनाथ कुवर यांनी दिलेल्या अर्जाबाबत झालेल्या कार्यवाहीचा तपशिल व दि.१३/०९/२०२१ च्या आवक जावक गा.न.नं.१५ ची साक्षांकित नक्कल."

४. आयोगाने, द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक संदर्भात दि.१०/०७/२०२४ रोजी झालेल्या सुनावणीअंती दि.१५/०४/२०२५ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहेत.

"विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग, ता.मालेगाव, जि.नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/ वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे."

५. सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असे कथन केले की, "श्री.रघुनाथ पर्वत कुवर, यांनी दि.२५/१०/२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जात नमूद केलेली माहिती अर्जदार यांना पोस्टाद्वारे दि.०७/०७/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेली आहे. अपिलकर्ता यांना पाठविण्यात आलेली माहिती या रिपोर्टसह जोडून सविनय सादर करण्यात येत आहे.

६.   सुनावणी दरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक संदर्भात दि.१५/०४/२०२५ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग, यांनी आदेशाची अंमलबजावणी उशिराने/विलंबाने केलेली दिसते. तसेच, सुनावणीवेळी तक्रारदार यांनी माहिती मिळाली नसल्याचे कथन केले आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग, श्री.ए.डब्लु.साने, यांनी तक्रारदार यांना आयोगाच्या आदेशानुसार माहिती दिली नसल्याचे दिसून येते.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाने द्वितीय अपिल क्र.१३६३/२०२२/नाशिक मध्ये दि.१५/०४/२०२५ अन्वये पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी, तलाठी कार्यालय, अजंग, श्री.ए.डब्लु.साने यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३) वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र.२५९/२०२५/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रत- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक, ता.जि.नाशिक, यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

जावक क्र. 294    01 JAN 2026